खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – डॉ. रावसाहेब कसबे

लोकमत

# कुठल्याही धर्माला अथवा महापुरुषाला केंद्रबिंदू न मानता घटनेची निर्मिती : कसबे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना कुठल्याही धर्माला अथवा महापुरुषाला केंद्रबिंदू न मानता सामान्य नागरिकांना केंद्रस्थानी मानले असल्याने सामान्य स्त्री-पुरुष राज्यघटनेचा आत्मा असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे उपस्थित होते.

डॉ. रावसाहेब कसबे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय ही संकल्पना रुजविताना देशातील प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्यायाबरोबर समान हक्क व दूरदृष्टी दिली. डॉ. आंबेडकरांना लोकशाहीमध्ये जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणण्याची व्यवस्था अपेक्षित होती. त्यासाठी आपण कटिबद्ध राहू. धर्म आणि राजकारण वेगळे ठेवू असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना खूप वाचन करा. समजून घ्या. जागृत व्हा आणि पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील राहा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे डॉ. के. बी. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. एस. शिरसी यांनी परिचय करून दिला, तर अक्षदा कोळेकर यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Jan 28, 2024
Powered by: erelego.com

दैनिक दायित्व
DAINIK DAYITVA



# राज्यघटनेचा केंद्रबिंदू सामान्य नागरिक - डॉ. रावसाहेब कसबे

राजगुरुनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना कुठल्याही धर्माला अथवा महापुरुषाला केंद्रबिंदू न मानता सामान्य नागरिकांना केंद्रस्थानी मानले असल्याने सामान्य स्त्री - पुरुष राज्यघटनेचा आत्मा असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे उपस्थित होते. डॉ. कसबे पुढे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय ही संकल्पना रुजवताना देशातील प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्यायाबरोबर समान हक्क व दूरदृष्टी दिली. डॉ. आंबेडकरांना लोकशाहीमध्ये जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणण्याची व्यवस्था अपेक्षित होती. त्यासाठी आपण कटीबद्ध राहू. धर्म आणि राजकारण वेगळे ठेवू असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना खूप वाचन करा. समजून घ्या. जागृत व्हा आणि पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील राहा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. के.बी.सोनवणे यांनी परिचय डॉ. आर.एस.शिरसी यांनी तर आभार अक्षदा कोळेकर या विद्यार्थीनीने मानले.

केसरी

# सामान्य नागरिक राज्यघटनेचा केंद्रबिंदू : कसबे

**राजगुरूनगर,** (वार्ताहर) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना कुठल्याही धर्माला अथवा महापुरुषाला केंद्रबिंदू न मानता सामान्य नागरिकांना केंद्रस्थानी मानले असल्याने सामान्य स्त्री - पुरुष राज्यघटनेचा आत्मा असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर कसबे बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे



अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे उपस्थित होते.

कसबे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय ही संकल्पना रुजवताना देशातील प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्यायाबरोबर समान हक्क व दूरदृष्टी दिली. डॉ. आंबेडकरांना लोकशाहीमध्ये जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणण्याची व्यवस्था अपेक्षित होती. त्यासाठी आपण कटीबद्ध राहू. धर्म आणि राजकारण वेगळे ठेवू असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना खूप वाचन करा. समजून घ्या. जागृत व्हा आणि पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील राहा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. के. बी. सोनवणे यांनी परिचय डॉ. आर.एस.शिरसी यांनी तर आभार अक्षदा कोळेकर या विद्यार्थीनीने मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**